वाचले-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी,

२. महाराष्ट्र शासन , राजपत्र असाधारण भाग चार-व,माघ २९ शके १९४१ दि.१८/०२/२०२०.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

४. पदोन्नती समिती सभा दिनांक ०७/०२/२०२४ चा सभावृत्तांत.

५. मा. आयुक्त सो. यांचा दिनांक ०८/ १० /२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/५/कावि/५९०/२०२४
दिनांक: ०८/ १० /२०२४

**विषय :'मुकादम' पदावरील पदोन्नतीबाबत...**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील 'मुकादम' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दिनांक ०७/०२/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती,

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व मुकादम पदाच्या निकटतम निम्न संवर्गामधील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी,सेवाज्येष्ठता,कामकाज अहवाल,शिस्तभंग इ सेवा विषयक तपशील पडताळुन खालील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रदद करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दिनांक ०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णय आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२० नुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार " मुकादम " या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे.

| अनु.क्र | सफाईकामगार,सफाई सेवक,गटरकुली,स्प्रेकुली,कंपोस्टकुली,डॉग-पिग स्कॉड कुली या पदावर कामकारणा-या कर्मचा-यांची मनपा सेवेतील रुजू दिनांकानुसार असलेलेली तात्पुरत्या एकत्रित सेवाज्येष्ठता यादी मधील से.ज्ये.क्रमांक | कर्मचारी नाव | पदनाम | पदोन्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ७६ | जगताप राहुल अरुण | सफाई कामगार | ज्येष्ठतेनुसार |
| २ | ७७ | मोरे सुधाकर संभाजी | सफाई कामगार | ज्येष्ठतेनुसार |
| ३ | ८० | इंगळे प्रविण उत्तम | सफाई कामगार | ज्येष्ठतेनुसार |
| ४ | ८१ | घोडके दत्तात्रय शरणाप्पा | सफाई कामगार | ज्येष्ठतेनुसार |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि. ७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच सदर पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र. (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार 'मुकादम ' या पदावर पे लेवल एस-३ वेतनश्रेणी र.रु.१६६००-५२४०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार आदेशाचे दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशाने मान्यता देत आहेत

उपरोक्त नमूद कर्मचारी सफाई संवर्गातील असल्याने मुकादम पदावर पदोन्नतीने त्यांना आरोग्य मुख्य कार्यालयातत पदस्थापना देण्यात येत आहे. संबंधित विभागप्रमुखांनी मुकादम पदावरील कर्मचा-यांना रुजू करुन घेतले

नंतर सविस्तर कामकाज वाटप करावे व सविस्तर कामकाज वाटपाची एक प्रत सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात यावी. सदर कर्मचा-यांना प्रत्यक्ष पदोन्नतीचे लाभ आदेशाचे दिनांकापासुन अनुज्ञेय राहतील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सही/-
**(शेखर सिंह)**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
संबंधित कर्मचारी
प्रत-

१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण ३) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९, १०, १२, संगणक कक्ष
४) पिं.चि.म.न.पा कर्मचारी महासंघ ५) पिं.चि.म.न.पा कर्मचारी सेवकांची सह. पतसंस्था
६) सर्व संबंधित विभाग

**( किरणकुमार मोरे)**
सहा.आयुक्त, साप्रवि
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८